# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०८/०७/२०२४

# प्रेसनोट

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांचे आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटूंबातील त्यांची निर्णायक भुमिका मजबुत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजना ठाणे जिल्हयामध्ये प्रभावीपणाने राबविण्यासाठी मा. प्रशासक तथा आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली उल्हासनगर महानगपालिका, महिला व बालकल्याण विभाग व बालविकास प्रकल्प अधिकारी, कल्याण, यांच्या संयुक्त विदयामाने सोमवार, दिनांक ०८/०७/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता अंगणवाणी सेविका व महापालिका अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी एकदिवसीय कार्यशाळा, सिंधु भवन, सपना गार्डन जवळ, उल्हासनगर – ३ याठिकाणी आयोजित करण्यात आली.

सदर कार्यशाळा, कार्यक्रमाकरीता मा. उप आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग श्री. सुभाष जाधव, नायब तहसिलदार, उल्हासनगर श्री. गणपत शिंगाडे, जनसंपर्क अधिकारी, श्रीम. छाया डांगळे, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ४ श्री. गणेश शिंपी, श्री. मनिष हिवरे व श्री. दत्तात्रय जाधव, कर निर्धारक व संकलक, श्रीम. निलम कदम, सिस्टम ॲनालिस्ट श्रीम. श्रध्दा बाविस्कर, एन.यु.एल.एम विभाग प्रमुख श्रीम. संजिवनी अमृतसागर व विभाग प्रमुख, महिला व बालकल्याण विभाग श्री. नितेश रंगारी तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी(नागरी), कल्याण श्री. अजय पडोळ व त्यांचे सह कर्मचारी उपस्थित होते.

उप आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग श्री. सुभाष जाधव यांनी "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजने संदर्भात प्रस्तावना मांडली. तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी(नागरी), कल्याण श्री. अजय पडोळ यांनी "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनाचे शासन निर्णय संदर्भात उपस्थित सर्व अंगणवाडी सेविका, उमपा अधिकारी व कर्मचारी यांना समजावून सांगितले. योजनेचा ऑफ लाईन /ऑनलाईन अर्ज पध्दत सांगण्यात आली व अंगणवाडी पर्यवेक्षक यांनी योजनेचे अर्ज व ॲप याबद्दल उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना माहिती देण्यात आली आणि शेवटी कार्यक्रमाचे सूत्र संचालन व कार्यक्रमाची सांगता जनसंपर्क अधिकारी, श्रीम. छाया डांगळे यांनी केली.

(छाया प्रकाश डांगळे)<br>
जनसंपर्क अधिकारी<br>
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.<br>
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका<br>
प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनालिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.